## ४. योजनेचे नांव :- अवर्षण प्रवण क्षेत्र विकास कार्यक्रम

योजनेची आवश्यकता: दुष्काळाची झळ कमी करण्यासाठी अवर्षण प्रवण क्षेत्र विकास कार्यक्रमाची आवश्यकता आहे.

■ **उद्देश**

वरील नमुद केलेल्या परिस्थितीत विशिष्ट उद्देश ठेवून पाणलोट क्षेत्रविकास कार्यक्रम राबविणे गरजेचे आहे.

✷ ग्रामीण भागातील ग्रामीण क्षेत्रावर अवलंबून असलेल्या जनतेचा खालीलप्रमाणे उपाय योजना करुन आर्थिक विकास वृध्दींगत करणे.

अ) जमीन, पाणी, झाडी, झुडपे इ.सारख्या पाणलोट क्षेत्रातील नैसर्गीक साधन संपत्तीचा कमाल वापर करुन अवर्षणाचे प्रतिकुल परिणाम सौम्य करणे व पर्यावरणाची भविष्यातील घसरण रोखणे.

ब) मानवी विकास व आर्थीक विकास होण्यासाठी स्थानिक पातळीवर उद्योग उपलब्ध करुन देणे, जेणे करुन काही प्रमाणात बचत करुन आर्थीक विकास साधता येवू शकेल.

✷ ग्रामीण भागातील पर्यावरणाचा समतोल कायम राखण्यास प्रवृत्त करणे.

अ) प्रकल्पाची प्रचलन करण्यात आलेल्या मत्ता यांची देखभाल करण्यासाठी जनतेचा कायम स्वरुपी सहभाग आणि पाणलोट क्षेत्रातील संपत्तीचा अव्याहत निर्मित ठेवणे.

ब) पाणलोट क्षेत्रातील साधन संपत्ती उपभोग करुन घेण्यासाठी सर्व सोपे तंत्रज्ञान वापरात आणण्यासाठी कायम स्वरुपी सस्थेची निर्मिती करणे.

✷ मत्ताहिन दुर्बल घटक, स्त्रिया आणि तुटपंजी असणा-या पाणलोट क्षेत्रातील व्यक्तींचा आर्थीक व सामाजिक विकास करणे.

अ) पाणी व जमीन साधनसंपत्ती विकासामुळे मिळणा-या फायद्याच्या बाबीचा तसेच त्यापासून पुढेही मिळत राहणा-या उत्पन्नाचे न्यायसंगत वाटप करणे.

ब) उत्पन्न निर्मितीच्या संधीसाठी अधिक वाव देणे, त्यांच्या मानवी साधन संपत्तीच्या विकासावर लक्ष केंद्रीत करणे.

■ **वर्ष निहाय निधी वितरण निकष :-**

अवर्षण प्रवण क्षेत्र विकास कार्यक्रम विकासासाठी स्वंतत्र कार्यक्रम म्हणून राबविता सर्वसाधारणपणे ५०० हेक्टर क्षेत्रफळ असलेल्या एका लघु पाणलोट क्षेत्रामध्ये संयुक्त प्रकल्प राबविण्यात येत आहे. एका प्रकल्पासाठी रु. ३०.०० लाखची तरतुद आहे वर्षनिहाय प्रयोजन खालीलप्रमाणे आहे.

| ***प्रथम वर्ष*** | ***(रु. लाखात)*** |
|---|---|
| प्रथम वर्ष | ३.०० |
| व्दितीय वर्ष | ४.५० |
| तृतीय वर्ष | ९.०० |
| चतुर्थ वर्ष | ९.०० |
| पंचम वर्ष | ४.५० |
| एकूण | ३०.०० |

यात शासनाचा सहभाग केवळ निधी उपलब्ध करुन देणे, संनियत्रण करणे एवढाच असुन सदर कार्यक्रम गावक-यांनी राबवावयाचा आहे.

विकास कार्यात सहभागी होण्यासाठी व यात आपलेपणाची जाण राहावी म्हणून प्रकल्प अंतर्गत सार्वजनिक जमिनीवरील कामे करीत असतांना **५ टक्के श्रमदान** व खाजगी जमिनीवरील कामे करीत असतांना **लोकवर्गणी १० टक्के** म्हणून घ्यावयाची असते. (अनु.जाती/जमाती) दारिद्रय रेषेखालील **लोकांचा सहभाग ५ टक्के** अशा त-हेने जमलेला निधी प्रकल्पावर खर्च न करता तो **स्वंतत्र पाणलोट क्षेत्र निधी** म्हणून समजण्यात येईल. त्या रक्कमेचा उपयोग तयार होणा-या मालमत्ता वर कायमस्वरुपी परिचलन व दुरुस्तीसाठी उपयोगात आणावयाचा आहे. जे ग्रामस्थ अशी वर्गणी देण्यास तयार असतील त्याच गावाची निवड या कार्यक्रमात करावयाची आहे.

## ५. योजनेचे नांव :- अवर्षण प्रवण क्षेत्र विकास कार्यक्रम
## (हरीयाली मार्गदर्शक सूचना)

<u>योजनेची आवश्यकता</u> : दुष्काळाची झळ कमी करण्यासाठी अवर्षण प्रवण क्षेत्र विकास कार्यक्रमाची आवश्यकता आहे.

**उद्देश :-**

**हरियाली चा उद्देश पंचायती राज संस्थांना शासनाच्या जलसंधारण विकास कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी प्रशासकीय आणि आर्थिक अधिकार देणे व त्यांचे मार्फत कार्यक्रम राबविणे.**

१. ग्रामीण भागातील जनतेला उत्पन्नाचे नियमित साधन उपलब्ध करुन देण्या करीता सिंचनाची व्यवस्था करणे ज्याव्दारे फलोद्यांन,चाराउत्पादन,मत्स्यपालन इत्यादी व्यवस्था करणे. तसेच पिण्याची उपलब्धते करीता पावसाव्दारे पडणारे पाणी संग्रह करणे.
२. ग्राम पंचायतीव्दारा ग्रामीण क्षेत्राचा संपूर्ण विकास तसेच पावसाचे पाणी संग्रह करुन त्याचे प्रबंधन व व्यवस्थापणाव्दारे ग्राम पंचायतीच्या उत्पन्नाचे नियमित साधने निर्माण करणे.
३. प्रकल्पासाठी सुक्ष्म पाणलोटाची निवड करतेवेळी गाव हा मुलभुत आधार धरावयाचा आहे.
४. ५०००-६००० हेक्टरचे पाणलोट/गांवसंकुल एक किंवा एकापेक्षा जास्त सलग्न असलेल्या गटामध्ये पाणलोट क्षेत्र राहील.

# ६. योजनेचे नांव :- अवर्षण प्रवण क्षेत्र विकास कार्यक्रम
## (हरीयाली मार्गदर्शक सूचना)

**योजनेचे संक्षिप्त विवरण** :- १.४.२००३ नंतर कार्यान्वीत होणारे नविन प्रकल्प हरीयाली मार्गदर्शक सचूना नुसार कार्यान्वीत करावयाच्या आहेत. हरियाली चा उद्देश पंचायती राज संस्थांना शासनाच्या जलसंधारण विकास कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी प्रशासकीय आणि आर्थिक अधिकार देणे व त्यांचे मार्फत कार्यक्रम राबविणे हा आहे. जिल्हयातीती १.वरोरा २.गोंडपिपरी ३.पोंभुर्णा ३.राजूरा ४.कोरपणा ५.जिवती या तालुक्यांमध्ये प्रकल्प राबविल्या जात आहे.

हरियाली अंतर्गत प्रकल्पाची उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत.

१. ग्रामीण भागातील जनतेला उत्पन्नाचे नियमित साधन उपलब्ध करुन देण्या करीता सिंचनाची व्यवस्था करणे ज्याव्दारे फलोद्यांन,चाराउत्पादन,मत्स्यपालन इत्यादी व्यवस्था करणे. तसेच पिण्याची उपलब्धते करीता पावसाव्दारे पडणारे पाणी संग्रह करणे.

२.ग्राम पंचायतीव्दारा ग्रामीण क्षेत्राचा संपूर्ण विकास तसेच पावसाचे पाणी संग्रह करुन त्याचे प्रबंधन व व्यवस्थापणाव्दारे ग्राम पंचायतीच्या उत्पन्नाचे नियमित साधने निर्माण करणे.

३. प्रकल्पासाठी सुक्ष्म पाणलोटाची निवड करतेवेळी गाव हा मुलभुत आधार धरावयाचा आहे.

४. ५०० हेक्टरचे पाणलोट/गांवसंकुल एक किंवा एकापेक्षा जास्त सलग्न असलेल्या गटामध्ये पाणलोट क्षेत्र राहील.

■ **वर्ष निहाय वितरण होणारा निधी :-**

अवर्षण प्रवण क्षेत्र विकास कार्यक्रम विकासासाठी स्वंतत्र कार्यक्रम म्हणून राबविता सर्वसाधारणपणे ५०० हेक्टर क्षेत्रफळ असलेल्या एका लघु पाणलोट क्षेत्रामध्ये संयुक्त प्रकल्प राबविण्यात येत आहे. एका प्रकल्पासाठी रु. ३०.०० लाखची तरतुद आहे वर्षनिहाय प्रयोजन खालीलप्रमाणे आहे.

| *प्रथम वर्ष* | *(रु. लाखात)* |
|---|---|
| प्रथम वर्ष | ४.५० |
| व्दितीय वर्ष | ९.०० |
| तृतीय वर्ष | ९.०० |
| चतुर्थ वर्ष | ४.५० |
| पंचम वर्ष | ३.०० |
| एकूण | ३०.०० |

यात शासनाचा सहभाग केवळ निधी उपलब्ध करुन देणे, संनियत्रण करणे एवढाच असुन सदर कार्यक्रम गावक-यांनी राबवावयाचा आहे.

योजनेचे निकष (अटी/शर्ती):- योजना सामुहीक स्वरुपाची असल्यामुळे लागू नाही